महाराष्ट्र शासन,
कृषी विभाग
विभागीय कृषी सहसंचालक, पुणे विभाग, पुणे
शिवाजीनगर पिन कोड नं- ४११००५
फोन नं. ०२०-२५५३७६९५/९६

ई-मेल - jdapune@gmail.com वेबसाईट - www.krishi.maharashtra.gov.in

**विभागीय कृषी सहसंचालक, पुणे कार्यालयाच्या आस्थापनेवरील भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील गट -क संवर्गातील वरिष्ठ लिपीक, सहाय्यक अधीक्षक ही पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात सन - २०२३.**

जाहिरात क्रमांक : २०६५
दिनांक :- ०३/०४/२०२३

१. राज्य शासनाच्या कृषी व पदूम विभागातील कृषी आयुक्तालयाच्या अधिनस्त विभागीय कृषी सहसंचालक, पुणे व अधिनस्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील गट -क संवर्गातील वरिष्ठ लिपीक, सहाय्यक अधीक्षक ही पदे सरळसेवेने भरण्याकरता सदर पदांसाठी पात्र उमेदवारांकडून कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन पद्धतीने दिनांक ६ एप्रिल,२०२३ पासून दिनांक २० एप्रिल,२०२३ या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांकरिता पात्र असणारे महाराष्ट्र राज्यातील तसेच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन- क्र.मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६, दिनांक १० जुलै, २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारही अर्ज करू शकतील. सदर पदांवरील भरतीकरता ऑनलाईन परीक्षा महाराष्ट्रातील निश्चित केलेल्या जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी नेमून दिलेल्या केंद्रावर घेण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेची तारीख कृषी विभागाच्या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल.

२. विभागीय कृषी सहसंचालक, पुणे व अधिनस्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक, सहाय्यक अधीक्षक या रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

२.१- वरिष्ठ लिपीक: एकूण पदसंख्या -१३ (रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे)

| प्रवर्ग | एकूण पदे | सर्व साधारण | महिला (३०%) | माजी सैनिक (१५%) | खेळाडू (५%) | प्रकल्प ग्रस्त (५%) | भुकंप ग्रस्त (२%) | अंश कालीन (१०%) | दिव्यांग (४%) | अनाथ (१%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु.जाती | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| अनु.जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| वि.जा. (अ) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| भ.ज. (ब) | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| भ.ज. (क) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| भ.ज. (ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| इ.मा.व | ३ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | | |
| आ.दु.घ. | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | | |
| अराखीव पदे | ४ | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | | |
| एकूण पदे | १३ | ८ | ४ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० |



दिव्यांग प्रकारानुसार आरक्षित पदे

| दिव्यांगत्व | अंध/ अल्पदृष्टी | कर्णबधिरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता | अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षाघात/ कुष्ठरोग मुक्त/ शारीरिक वाढ खुंटणे/ आम्ल हल्लाग्रस्त /स्नायू विकृती | स्वमग्नता/ मंदबुध्दी किंवा आकलनक्षमतेची कमतरता/ विशिष्ट शिक्षण अक्षमता/ मानसिक आजार | बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व |
|---|---|---|---|---|---|
| आरक्षित पदे | १ | ० | ० | ० | ० |

२.२- सहाय्यक अधीक्षक: एकूण पदसंख्या -०५ (रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे)

| प्रवर्ग | एकूण पदे | सर्व साधारण | महिला (३०%) | माजी सैनिक(१५%) | खेळाडू(५%) | प्रकल्प ग्रस्त(५%) | भुकंप ग्रस्त (२%) | अंश कालीन (१०%) | दिव्यांग (४%) | अनाथ (१%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु.जाती | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनु.जमाती | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| वि.जा. (अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| भ.ज. (ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| भ.ज. (क) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| भ.ज. (ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| इ.मा.व | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | | |
| आ.दु.घ. | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| अराखीव पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | |
| एकूण पदे | ५ | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

<u>दिव्यांग प्रकारानुसार आरक्षित पदे</u>

| दिव्यांगत्व | अंध/ अल्पदृष्टी | कर्णबधिरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता | अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षाघात/ कुष्ठरोग मुक्त/ शारीरिक वाढ खुंटणे/ आम्ल हल्लाग्रस्त /स्नायू विकृती | स्वमग्नता/ मंदबुध्दी किंवा आकलनक्षमतेची कमतरता/ विशिष्ट शिक्षण अक्षमता/ मानसिक आजार | बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व |
|---|---|---|---|---|---|
| आरक्षित पदे | ० | ० | ० | ० | ० |